महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com | www.facebook.com/maharashtra.c.times | Info@maharashtracrimetimes.com | Twitter- @MHCrimeTimes | Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: ०१ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ६ एप्रिल २०२१ ते सोमवार १२ एप्रिल २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

चिंता केल्याने बिघडलेल्या गोष्टी चांगल्या होत नाही, पण त्यावर चिंतन केल्याने चांगला मार्ग सापडतो.

## थोडक्यात

### दहावी आणि बारावीच्या परीक्षांबाबत शिक्षण विभागाची लवकरच निर्णय

**मुंबई (विशाल पाटील)-** देशातील आणि राज्यातील कोरोनाबाधितांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना परीक्षेविना पास करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला. आता नववी, दहावी, अकरावी



आणि बारावीच्या परीक्षेबाबत कोणता निर्णय घेतला जातो, याकडे सर्व पालकांचे लक्ष लागून राहिले आहे. यासंदर्भात शिक्षण विभागाची उद्या महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली असून त्यानंतर दुपारी १२.३० वाजता शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड निर्णयाची घोषणा करतील. पहिली ते आठवीप्रमाणेच नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांनाही सरसकट पास करण्याबाबत घोषणा उद्याच्या या बैठकीत होण्याची शक्यता आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा मात्र ऑफलाईन पद्धतीनेच घेतल्या जाऊ शकतात.

### आम्हाला नुकसान भरपाई देणार का? व्यापाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांना प्रश्न

**मुंबई (प्रतिनिधी)-** कोरोनाच्या वाढत्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कठोर निर्बंध जाहीर लागू केले आहेत. दरम्यान यानंतर व्यापारी संघटनांची नाराजी पाहायला मिळत आहे. आम्हाला नुकसानभरपाई देणार का? असा प्रश्न व्यापारी संघटनांनी राज्य



सरकारला विचारलाय. हा मिनी लॉकडाऊन आहे असं सरकार म्हणत आहे मात्र व्यापाऱ्यांसाठी हा पूर्णपणे लॉकडाऊन आहे. मॉल, रेस्टॉरंट बंद असणार आहेत. १३ लाख दुकानांपैकी १०% दुकानं अत्यावश्यक असतील. बाकी सर्व दुकानं बंद राहणार आहेत. या निर्णयामुळे व्यापारी नाराज आहेत. वाढत्या कोरोनामुळे सरकारने हा निर्णय घेतला. पण आमच्या कर्मचाऱ्यांचा पगार कोण देणार, टॅक्स, भाडं कसं भरणार? असा प्रश्न व्यापारी संघाचे अध्यक्ष विरेन शाह यांनी उपस्थित केलाय. आम्ही सरकारबरोबर आहोत, पण जर लोक घरी बसले तर खाणार काय? त्यांना पगार कोण देणार? त्यांच्या मुलांना कुटुंबाना पैसे कोण देणार? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केलाय.

# अनिल देशमुख यांनी दिला गृहमंत्रीपदाचा राजीनामा



**मुंबई (योगेश होळंब)- ठाकरे सरकारमधील आणखी मंत्र्याने राजीनामा दिला आहे. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केलेल्या गंभीर आरोपांमुळे वादात सापडलेले गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. परमबीर सिंह यांनी देशमुख यांच्यावर १०० कोटी रुपये वसुलीचे टार्गेट दिल्याचा आरोप केला होता.**

मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआयला चौकशीचे आदेश दिल्यानंतर अनिल देशमुख यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन त्यांना माहिती दिली. त्यानंतर आता मुख्यमंत्र्यांकडे राजीनामा सुपूर्द करणार आहेत. राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नबाव मलिक यांनी याची माहिती दिली.

'मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीला अनिल देशमुखही उपस्थित होते. देशमुख यांनी पवारांकडे राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावर शरद पवार यांनी होकार दिला. देशमुख यांनी पवारांकडे राजीनामा दिला असून, आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या भेटीला ते निघाले आहेत. मुख्यमंत्र्यांना भेटून ते त्यांच्या पदाचा राजीनामा देणार आहेत,' अशी माहिती राष्ट्रवादीचे प्रवक्ते आणि राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी दिली आहे.

'मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्याकडे ॲड. जयश्री पाटील यांच्याद्वारे दाखल केलेल्या याचिकेमध्ये आज ५ एप्रिल २०२१ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये त्यांच्या तक्रार अर्जावर सीबीआय मार्फत प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश पारित केलेले आहेत. त्यानुषंगाने मी, मंत्री (गृह) या पदावर राहणे मला नैतिकदृष्ट्या योग्य वाटत नाही, म्हणून मी स्वतःहून या पदापासून दूर राहण्याचा निर्णय घेत आहे. सबब मला मंत्री (गृह) या पदावरून कार्यमुक्त करावे, ही नम्र विनंती,' असं अनिल देशमुख यांनी आपल्या राजीनाम्यात म्हटलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्या. गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने परमबीर सिंह यांनी केलेल्या याचिकेसह अन्य याचिकांवर सुनावणी झाल्यानंतर निर्णय बुधवारी राखून ठेवला होता. त्यावर आज न्यायालयाने निकाल दिला. 'जयश्री पाटील यांनी मलबार हिल पोलिसांत तक्रार करूनही त्याची दखल घेण्यात आलेली नाही.

## आता कोणाकडे असणार गृहखात्याची जबाबदारी

महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या अडचणी वाढल्या आहेत. कारण अनिल देशमुख यांच्याविरूद्ध सीबीआय चौकशीचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. परमबीर सिंग यांनी केलेले सर्व आरोप गंभीर असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडेच आता गृहखात्याची जबाबदारी देखील असणार आहे. अनिल



देशमुख यांच्या राजीनाम्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेच राज्याचे गृहमंत्री म्हणून देखील काम पाहणार आहेत. जयश्री पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्यात त्यांनी परमबीर सिंग यांच्याकडून अनिल देशमुखांवर १०० कोटींच्या वसुलीच्या आरोपावर सीबीआय चौकशीची मागणी केली होती. सीबीआयने आपला प्राथमिक तपास अहवाल पंधरा दिवसांत उच्च न्यायालयात सादर करावा, असे हायकोर्टाने म्हटले आहे. राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावरील आरोप खूप गंभीर आहेत, असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. उच्च न्यायालयाने सांगितले की, अनिल देशमुख हे महाराष्ट्राचे गृहमंत्री आहेत आणि यामुळे इज प्रकरणाची चौकशी निःपक्षपाती असावी. त्यानंतर आता अनिल देशमुख यांनी राजीनामा दिला आहे.

## ...तर फटाक्यांची माळ लागेल; राज ठाकरेंचं 'ते' भाकीत खरं ठरणार?

बॉम्बे हायकोर्टाच्या सीबीआय तपासाच्या निकालानंतर अनिल देशमुख गृहमंत्रीपदावरुन पायउतार झाले आहेत. या प्रकरणात गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्यावर राजीनाम्यासाठी दबाव होता. पण देशमुखांवर झालेले आरोप अत्यंत गंभीर आहेत, असा ठपका ठेवत हायकोर्टाने सीबीआय



तपासाचे आदेश दिल्यानंतर देशमुखांनी राजीनामा दिला. या राजीनाम्यानंतर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या एका वक्तव्याची चर्चा होत आहे, ज्यात त्यांनी केंद्र सरकारकडून चौकशीची मागणी केली होती.

केंद्र सरकारने निष्पक्ष चौकशी केली तर फटाक्याची माळ लागेल, असं भाकीत राज ठाकरेंनी केलं होतं. अनिल देशमुख यांनी मुंबई पोलीस दलातील निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना दरमहा १०० कोटी रुपये वसुलीचे टार्गेट दिलं होतं, असं आरोप करणारं पत्र मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलं होतं. यानंतर राज्यात एकच खळबळ उडाली. भाजपनंतर राज ठाकरे यांनीही गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या प्रकरणात केंद्राने हस्तक्षेप करुन तपास करावा, केंद्राने योग्य चौकशी केल्यास फटाक्यांची माळ लागेल, असं वक्तव्य राज ठाकरे यांनी केलं होतं.

## सीबीआय चौकशीला घाबरून देशमुखांनी राजीनामा दिला

राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आपल्या पदाचा राजीनामा आज दिला. त्यांच्या या भूमिकेला पक्षाने समर्थन दिले आहे. यावर प्रतिक्रिया देताना भाजप नेते नारायण राणे म्हणाले, आपली नाव पुढे येतील याची अनेकांना भीती आहे. सीबीआय चौकशीला घाबरून देशमुखांनी राजीनामा दिला. राज्याचे मुख्यमंत्री गप्प का आहेत? असा सवालही त्यांनी



यावेळी उपस्थित केला. नारायण राणे पत्रकार परिषदेत बोलत होते. राणे म्हणाले, परमबीर सिंह यांच्या आरोपानंतरचं देशमुखांनी राजीनामा द्यायला हवा होता. हायकोर्टाच्या निकालानंतर अनिल देशमुखांना राजीनामा द्यावा लागला. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी राजीनाम्यावर बोलायला हवं होतं. हायकोर्टाने दिलेल्या आदेशानंतर खळबळ उडाली. या सर्व प्रकरणात मुख्यमंत्र्यांचा वरदहस्त आहे, असा आरोप करत त्यांनी ठाकरे सरकारवर टीका केली. आतापर्यंत दोन मंत्र्यांनी राजीनामे दिले. ठाकरे सरकारमधील नेते गप्प का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी मुख्यमंत्र्यांवर ताशेरे ओढले. मुख्यमंत्रीपदासाठीची पात्रता, गुणवत्ता मुख्यमंत्र्यांकडे नाही. त्यांना राज्याचा अभ्यास नाही, खात्यांचा अभ्यास कळत नाही. बजेट कळत नाही. मुख्यमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी घ्यायला हवा होती. मुख्यमंत्रींना सर्व भ्रष्टाचाराची माहिती असते. सीबीआय आणि कोर्टावर माझा पूर्ण विश्वास आहे.

# महाराष्ट्रात रुग्णवाढीचा विस्फोट

## दिवसभरात ५७ हजारांहून अधिक नव्या रुग्णांची नोंद

**मुंबई (राजेश गायकवाड)-** महाराष्ट्र राज्यात कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर आजचा दिवस महत्त्वपूर्ण ठरला. आजच्या दिवशी मुख्यमंत्री मिळाला आहे. आज राज्यात नव्या कोरोना नियमांची घोषणा करण्यात आली. या नव्या घोषणेनुसार, राज्यात वीकेंड लॉकडाऊनचा महत्त्वपूर्ण निर्णय ठाकरे सरकारकडून



उद्धव ठाकरे यांच्याकडून कोरोनाच्या उपाययोजनांबाबत तातडीने बैठक घेण्यात आली. राज्यात लॉकडाऊन लागणार की कडक निर्बंध लागू होणार? याबाबत खलबतं सुरु होती, आणि अखेर त्याला पूर्णविराम घेण्यात आला आहे. तसेच राज्यात इतर दिवशी देखील कडक नियम जाहीर करण्यात आले आहेत. मात्र, आज दिवसभरात सापडलेली रुग्णसंख्या ही चिंताजनकच आहे. महाराष्ट्र राज्यात आज दिवसभरात नवे ५७,०७४ रुग्ण सापडले आहेत. या नव्या रुग्णांसह देशातील आजवरच्या एकूण रुग्णांची संख्या ही ३०,१०,५९७ वर पोहोचली आहे. राज्यात आज २७,५०८ रुग्ण बरे झाले आहेत. या नव्या बऱ्या झालेल्या रुग्णांसह राज्यातील एकूण आतापर्यंतच्या बऱ्या झालेल्या रुग्णांची संख्या ही २५,२२,८२३ वर पोहोचली आहे. राज्यात आज २२२ कोरोनाबाधितांचा मृत्यू झाला आहे. या नव्या मृतांसह राज्यातील एकूण आजवरच्या मृतांची संख्या ही ५५,८७८ वर पोहोचली आहे. सध्या राज्यात ४,३०,५०३ रुग्ण ॲक्टीव्ह आहेत. राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण आता ८३.८% झाले आहे.

-शनिवारी आणि रविवारी संपूर्ण लॉकडाऊन असेल

-सर्व प्रकारची वाहतूक सुरु असेल, गर्दीचे ठिकाणं बंद

-हॉटेल्स, रेस्तराँ, सिनेमागृहे, थिएटर, मॉल ३० एप्रिलपर्यंत बंद असतील, पार्सल सेवा सुरु राहील

-उद्योग सुरु राहतीस पण वेळेचे बंधन पाळावे लागेल. कर्मचाऱ्यांची आरटीपीसीआर टेस्ट आवश्यक

चित्रपट, मालिकांच्या शुटिंगला परवानगी, पण गर्दीच्या ठिकाणी शुटींग नाही

-कन्स्ट्रक्शन साईट सुरु राहतील, पण, मालकाला कर्मचाऱ्याची काळजी घ्यावी लागणार.

# राज्यात कोरोनाचे दोन स्ट्रेन अत्यंत गंभीर, डॉक्टरांनी दिला 'हा' गंभीर इशारा

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** महाराष्ट्रातील कोरोनाचे दोन स्ट्रेन अत्यंत गंभीर असून देशात कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा धोका असल्याचा इशारा एएंई चे प्रमुख डॉ. शेखर मांडे यांनी दिला आहे. महाराष्ट्रातले दोन स्ट्रेन १५ ते २० टक्के लोकांमध्ये आढळतायत. जो कोणी व्यक्ती कोरोना पॉझिटीव्ह येतो, त्याने आपल्या संपर्कात आलेल्या सर्वांना चाचणी करण्यास सांगण आवश्यक असल्याचे डॉक्टर मांडे म्हणाले. राज्यात चाचण्या वाढणं गरजेचं आहे. हे सुरुवातीपासून आपण करत आलोय. राज्य सरकारने योग्य पाऊल उचललंय. पण लोकांनी शिस्त पाळणं गरजेच आहे. आजच्या दिवशी भारतात दोन लसी आहेत. या फायदेशीर असल्याचे ते म्हणाले.



सध्या लोकांच्या वाढदिवस, लग्नाच्या पाट्या, फिरणं सुरु झालं होतं. यावर नियंत्रण ठेवावं, बंद जागेत एकत्र येऊ नये. मास्क शिवाय बाहेर फिरु नये. सरकारचे नियम शिस्तीने पाळावे. स्वत:वर अनुशासन ठेवावं असेही ते म्हणाले.

परिस्थिती गंभीर आहे. इतिहासात जेव्हा अशा परिस्थिती निर्माण झाल्या तेव्हा महाराष्ट्राने देशाला, जगाला दिशा दाखवली होती. या परिस्थितीचा सामना करणे आवश्यक असल्याचे डॉक्टर म्हणाले. राज्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ३० एप्रिलपर्यंत कठोर निर्बंध लागू केले आहेत. कल्याण डोंबिवली क्षेत्रात कोरोनाचा उद्रेक वाढत आहे. राज्यात आज ५७ हजार ७४ नव्या रूग्णांची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे निर्बंधांचा पालन करणं अत्यंत गरजेचं आहे.

कल्याण डोंबिवली क्षेत्रात आज सर्वाधिक १ हजार ६९३ नव्या कोरोना रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. उपचार घेत असलेले रुग्ण १० हजार ३०८ आहेत. गेल्या २४ तासात ३ कोरोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मुंबईत आज कोरोना रूग्णांची संख्या ११ हजार १६३ नोंद करण्यात आली आहे.

# शरद पवार पुन्हा उतरले कोविड युद्धात; जनतेला दिला 'हा' विश्वास

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** धीर, संयम, दक्षता आणि परस्पर सहकार्याच्या बळावर आपण करोना महामारीवर निश्चित मात करू, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद यांनी व्यक्त केला आहे. राज्यात करोनाचं संकट गडद होत असतानाच शरद पवार यांनी एक विशेष आवाहन करणारं पत्र राज्यातील जनता आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना उद्देशून लिहिलं आहे. कोविड - १९ च्या महामारीने गंभीर रूप घेतले असून या संकटावर मात करण्यासाठी राज्यातील जनतेने



सहकार्य करावे आणि सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे असे आवाहन शरद पवार यांनी केले आहे. या अभूतपूर्व संकटातून जनतेला बाहेर काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी स्थानिक स्तरावर झोकून द्यावे, असे आवाहनही शरद पवार यांनी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना केले आहे. करोना या जागतिक महामारीची दुसरी लाट संपूर्ण राज्यात पसरली आहे. दिवसेंदिवस रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असून परिस्थिती अत्यंत चिंताजनक झाली आहे. राज्यशासन, पोलीस व प्रशासकीय यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. त्याचवेळी राज्यातील आरोग्य यंत्रणेतील डॉक्टर्स, परिचारिका व संलग्न कर्मचारी रुग्णांना दिलासा देण्यासाठी अहोरात्र झटत आहेत. अशावेळी या भीषण संकटावर मात करण्यासाठी जनतेच्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणूनच राज्यशासनाने वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सल्ल्याने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे जनतेने तंतोतंत पालन करावे. गर्दी टाळणे, सामाजिक अंतर राखणे, मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करणे, स्वच्छता राखणे वगैरे सूचना कसोशीने पाळाव्यात.

# रेमडेसिविर, ऑक्सीजनचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** सध्या महाराष्ट्रात कोविडच्या रुग्ण संख्येत झपाट्याने वाढ होत असून, संभाव्य वाढणाऱ्या रुग्णांचे हित लक्षात घेऊन मेडिकल ऑक्सिजन व रेमडेसिविर इंजेक्शनचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री राजेंद्र शिंगणे यांनी दिले. या संदर्भात रेमडेसिविर इंजेक्शनचे उत्पादक व मेडिकल ऑक्सीजन उत्पादक यांच्या प्रतिनिधींसमवेत बांद्रा येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कार्यालयात मंत्री शिंगणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. राज्यात केवळ सात दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा शिल्लक आहे. त्यामुळे सर्व रक्तपेढ्यांनी तसेच स्वयंसेवी संस्थांनी कोरोना नियमांचे काटेकोरपणे पालन करून रक्तदान शिबिरे आयोजित करावी, असे आवाहनही राजेंद्र शिंगणे यांनी यावेळी केले. महाराष्ट्र राज्यासाठी जास्तीत जास्त रेमडेसिविर इंजेक्शनचा पुरवठा व मेडिकल ऑक्सिजनची उपलब्धता यांचे नियोजन करण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या. सर्व उत्पादकांनी प्राधान्याने महाराष्ट्र राज्यासाठी औषधाचा पुरवठा करण्याचे आश्वासन



दिलेले असून, सध्या देखील सुमारे ५० ते ६० हजार इंजेक्शनचा साठा दररोज उपलब्ध होत आहे. त्यामुळे राज्यात रेमडेसिविर इंजेक्शनचा फारसा तुटवडा नाही. राज्यात निर्माण होणाऱ्या ऑक्सीजन साठ्यापैकी ८० टक्के साठा हा वैद्यकीय वापरासाठी राखीव ठेवला आहे. महाराष्ट्र राज्यातील दररोजचे ऑक्सीजनचे उत्पादन १२५० मेट्रीक टन इतके असून त्यापैकी ७०० टन साठा वैद्यकीय कारणासाठी वापरला जात आहे. तसेच आवश्यकता भासल्यास जेथे कोविड रुग्ण मोठया संख्येने नाहीत अशा राज्यामधुन देखील ऑक्सिजन प्राप्त करुन घेण्यासाठी प्रशासन स्तरावर चाचपणी सुरु आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.



संपादक:- राकेश शंकर गोरे

# आर्थिक प्रश्नचिन्हे कायमच

सरकारकडे विक्रमी जीएसटीरूपी महसूल जमा झालेला आहे. ही बाब अर्थव्यवस्था पूर्वपदावर येत असल्याचे लक्षण आहे, असा दावा अर्थव्यवहार सचिवांनी केला असला तरी कोरोनाची दुसरी लाट लक्षात घेता त्यासंबंधी आत्ताच छातीठोकपणे दावा करणे घाईचे होईल. नवे म्हणजेच २०२१-२२ हे आर्थिक वर्ष सुरु झाले आहे. २०२०-२१ हे आर्थिक वर्ष कोरोनाच्या दुष्ट छायेत राहिले होते. केंद्र सरकारने मदतयोजनांच्या द्वारे अर्थव्यवस्थेची घसरण थांबविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु संकट मोठे असल्याने या मदतयोजना पुरेशा ठरल्या नाहीत आणि फलनिष्पत्ती अपेक्षेनुसार होऊ शकली नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा विकासदर 'उणे २४'' टक्क्यांपर्यंत खालावला होता. एक फेब्रुवारीला अर्थमंत्र्यांनी २०२१-२२साठीचा अर्थसंकल्प सादर केला, तेव्हा सरकारतर्फे देण्यात आलेल्या माहितीनुसार विकासदराने नकारात्मक स्थितीतून सकारात्मक स्थितीत(०.४ टक्के) प्रवेश केला होता. अर्थमंत्र्यांच्या दाव्यानुसार मदतयोजनांचे परिणाम दिसू लागले आहेत आणि हीच प्रक्रिया पुढे चालू राहिल्यास येत्या आर्थिक वर्षात किमान पाच टक्के विकासदराची मजल गाठणे शक्य होईल. त्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात विविध आक्रमक अशा आर्थिक योजनांच्या घोषणाही केल्या आहेत. वर्ष जसेजसे पुढे जाईल त्यानुसार आर्थिक चित्रही स्पष्ट होत जाईल.

ताज्या आकडेवारीनुसार, सरकारकडे विक्रमी जीएसटीरुपी महसूल जमा झाला आहे. मार्च महिन्यात एक लाख २३ हजार ९२ कोटी रुपयांची 'जीएसटी'ची मिळकत झाल्याचे नुकतेच जाहीर करण्यात आले. हे चित्र गुलाबी आहे. अर्थव्यवहार सचिवांच्या म्हणण्यानुसार, कोरोना संकटातून अर्थव्यवस्था बाहेर पडण्याची ही सुरुवात आहे. त्यामुळेच जीएसटी करभरणीने विक्रम गाठला आहे. अर्थसचिवांचे म्हणणे ग्राह्य धरावे लागेल. परंतु ही मार्च अखेरीची म्हणजे आधीचे आर्थिक वर्ष संपतानाची स्थिती आहे. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार कोरोनाने पुन्हा हातपाय पसरण्यास सुरुवात केल्यानंतर स्थिती वेगळे वळण घेऊ शकते आणि कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचाही अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकेल. त्यामुळेच अद्याप आर्थिक स्थितीबद्दलचे प्रश्नचिन्ह कायम आहे. कोरोनामुळे वित्तीय तूट वाढून ते संकट गुंतागुंतीचे होते, ही बाब लक्षात घेऊनच अर्थसंकल्पात खासगीकरणाची महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आली आहे. त्याचबरोबर अनेक केंद्रीय योजनांना कात्रीही लावण्यात आलेली आहे. स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल-डिझेलच्या माध्यमातूनही महसूल-प्राप्ती सुरुच आहे. त्याखेरीज जी शुल्के(सेस) लावण्यात आलेली आहेत, त्याद्वारेही केंद्र सरकार पैसा जमविण्याच्या प्रयत्नात आहे. 'जीएसटी'ची विक्रमी प्राप्ती झाल्यानंतर तिचे त्वरित राज्यवार वितरण करणे अपेक्षित आहे. अन्यथा केंद्र सरकारने गेल्या वर्षी घटनाबाह्य किंवा बेकायदारीत्या 'जीएसटी'ची मिळकत केंद्र सरकारच्या तिजोरीत भरुन त्याचा वापर सुरु केला होता. महालेखा-नियंत्रकांनी त्यावर ताशेरे झाडले होते. तसेच राज्यांनीदेखील जीएसटी परिषदेत हा मुद्दा उचलून धरल्यानंतर केंद्र सरकारने राज्यांना पैशाचे वाटप हप्त्याहप्त्याने करण्यास सुरुवात केली.

एका बाजूला ही स्थिती असली तरी दुसरीकडे किंमत निर्देशांक महागाईच्या आघाडीवर चिंतेची स्थिती आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असल्याचे



निदर्शनाला आले आहे. किराणा, भाजीपाला व फळे, इंधन म्हणजेच स्वयंपाकाचा गॅस व डिझेल-पेट्रोल यांच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे दरमहाचे पैशाचे गणित बिघडलेले आहे. फेब्रुवारी महिन्यातील किरकोळ किंमत निर्देशांक ५ टक्क्यांवर तर घाऊक किंमत निर्देशांक ४.२ टक्के नोंदला गेला. आधीच्या तीन महिन्यांच्या तुलनेत ही उच्चांकी आकडेवारी आहे. महागाईचे चटके बसू लागले आहेत. सरकार या परिस्थितीचा मुकाबला कसा करु इच्छिते हे लवकरच कळेल, अशी अपेक्षा आहे. सरकारने इंधन किमती अल्प प्रमाणात कमी करण्याचा पवित्रा घेतलेला असला तरी तो तुटपुंजा आहे.

यापुढील काळात सरकारचे मनसुबे काय असतील याची चुणूक ठेवींवरील व्याजदरांमधील तीव्र कपातीच्या सरकारी प्रस्तावांवरुन सर्वांनाच मिळाली आहे. सरकारने सर्व ठेवींवरील तसेच वयस्क व ज्येष्ठ नागरिक तसेच निवृत्तांच्या विविध ठेवयोजनांवरील व्याजदरात अत्यंत मोठी कपात करणारे परिपत्रक काढले आणि त्याचा फटका बसण्याची चिन्हे दिसू लागताच ते तत्काळ मागेही घेऊन नजरचुकीने ते घडल्याची सारवासारवही केली. परंतु जनता एवढी दुधखुळी नसते. सरकारचे मनसुबे ती जाणत असते आणि तूर्तास सरकारने माघारी घेतलेली असली तरी भविष्यात सरकार ही कु□हाड सेवानिवृत्त, वरिष्ठ नागरिकांवर चालविणार हे स्पष्ट झाले आहे. ठेवींवरील व्याजदर कमी केल्याने नागरिकांनी वर्षानुवर्षे श्रम करुन मिळविलेल्या पैशाचा सुयोग्य परतावा मिळण्यासाठी काय करावे, असा प्रश्न निर्माण होणे अत्यंत स्वाभाविक आहे. याठिकाणी १९९१ मध्ये सुरु करण्यात आलेल्या आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेनंतर निर्माण झालेल्या काही आर्थिक विकृतीची स्वाभाविक आठवण येते. यामध्ये कॉंग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांची सरकारे सामील आहेत आणि जबाबदारही आहेत. सर्वसाधारण नागरिक त्याने कष्टाने मिळविलेले पैसे सुरक्षित ठेवण्याच्या हेतूने; तसेच सरकारी योजनांमध्ये त्याला उचित परतावा मिळत असल्याने त्यात गुंतवत असतो.

## नांदेडमध्ये अशोक चव्हाणांचा भाजपला धक्का; महाविकास आघाडीची मुसंडी!

**नांदेड (नमिता मुणगेकर)-** शेतकऱ्यांची कामधेनू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती



बँकेवर प्रथमच कॉंग्रेसची एकहाती सत्ता आली असून २१ पैकी १७ जागांवर विजय मिळवून महाविकास आघाडीने घवघवीत यश संपादित केले आहे. विरोधकांबरोबरच स्वपक्षीयांशी लढणाऱ्या खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांना मोठा धक्का बसला आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळाच्या २१ जागांसाठी निवडणुकीची प्रक्रिया दोन एप्रिल रोजी पार पडली. या निवडणुकीत प्रथमच पालकमंत्री अशोक चव्हाण व भाजपचे खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. मतदार यादीवरून कनिष्ठ न्यायालय ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत वाद गेला होता. निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीचे बाळासाहेब रावणगावकर, माजी आमदार नागेश पाटील आष्टीकर, तर भाजपचे भास्करराव पाटील खतगावकर बिनविरोध विजयी झाले होते. रविवारी मतमोजणी झाल्यानंतर महाविकास आघाडीचे एकूण १७ उमेदवार विजयी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यापैकी कॉंग्रेसचे बारा उमेदवार विजयी झाले आहेत. अत्यंत चुरशीच्या निवडणुकीत अनेक मतदारसंघात एक-दोन मताने भाजप उमेदवारांचा पराभव झाला. अर्धापूरमधून कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष केवळ एका मताने विजयी झाले. नागेलीकर यांना १८, तर भाजपचे पवार यांना १७ मते मिळाली. चिखलीकर व त्यांचे सुपुत्र प्रवीण पाटील चिखलीकर यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव केला. माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते नामदेवराव केशवे यांचे सुपुत्र राजेंद्र केशवे आपापल्या मतदार संघातून विजयी झाले. अनुसूचित जाती-जमाती मतदार संघातून कॉंग्रेसच्या सविता मुसळे यांनी भाजपच्या विद्यमान संचालक लक्ष्मण ठक्करवाड यांचा दारुण पराभव केला. मुसळे यांना ५६६, तर ठक्करवाड यांना ३१९ मते मिळाली. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष हरिहरराव भोसीकर यांनीही प्रतिस्पर्ध्यांचा पराभव केला.

# प्रदूषित उद्योगांत वाढ

**ठाणे (तृप्ती गोरे)-** मुंबई महानगर प्रदेशातील सर्वाधिक नागरीकरण असलेल्या ठाणे-पालघर जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रदूषित कारखानेही असल्याची बाब नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालामधून समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून २०२०-२१ या वर्षामध्ये ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई या विभागात समाविष्ट असलेल्या ठाणे-पालघर जिल्ह्यांतील सुमारे १५ हजार ९३१ कारखान्यांचे सर्वेक्षण केले होते. त्यामध्ये प्रदूषित कारखान्यांच्या तीव्रतेनुसार त्यांना लाल, नारंगी, हिरवा आणि पांढरा रंग देण्यात आला आहे. २०१९-२०मध्ये या भागातील ४ हजार २५८ कारखाने लाल रंगामध्ये समाविष्ट झाले होते. तर यंदा ही संख्या ४८३ने वाढून ४ हजार ७४१ झाली आहे. प्रदूषण विरहित कारखान्यांचा आकडाही दुप्पट वाढल्याचे



समोर आले आहे. विशेष म्हणजे, कारखान्यांच्या संख्येमध्ये अव्वल असलेल्या पुणे जिल्ह्यामध्येही प्रदूषित कारखान्यांची संख्या ठाणे-पालघरपेक्षा कमी आहे.

मुंबई महानगर प्रदेशामध्ये समाविष्ट असलेल्या ठाणे-पालघर जिल्ह्यात दाट लोकवस्ती असून कारखान्यांची संख्याही या भागात जास्त आहे. ठाणे शहरातील औद्योगिक कारखान्यांची संख्या कमी झाली असली तरी डोंबिवली, पालघर, नवी मुंबईमध्ये कारखान्यांची संख्या मोठी आहे. औद्योगिक क्षेत्रात समाविष्ट असलेल्या या कारखान्यांच्या क्षमतेनुसार त्यांची मोठे, लहान आणि मध्यम अशी वर्गवारी केली जाते. त्याचप्रमाणे प्रदूषण नियंत्रण मंडळ या कारखान्यांच्या प्रदूषण निर्देशांकानुसार त्यांचे लाल, नारंगी हिरव्या आणि पांढऱ्या रंगामध्ये विभाजन करते. यामध्ये या भागात लाल रंगाचे कारखाने राज्यामध्ये सर्वाधिक असून गतवर्षीपेक्षा यंदा प्रदूषित कारखान्यांची संख्या ४७५ने वाढली आहे.

# ठाण्यात बेकायदा पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

**ठाणे (आकाश कांबळे)- शहरातील अंतर्गत रस्त्यावर बेकायदा उभी करण्यात आलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी काही महिन्यांपूर्वी अशा वाहनांवर कारवाई सुरू केली होती. मात्र, ही कारवाई आता थंडावल्याने रस्त्यावर पुन्हा बेकायदा वाहने उभी करण्याचे प्रकार सुरू झाले असून या वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन शहराच्या अंतर्गत मार्गावर कोंडी होत असल्याचे चित्र आहे.**

ठाणे शहरातील अंतर्गत रस्त्यावर होणाऱ्या कोंडीची समस्या सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने काही वर्षांपूर्वी रस्ते रुंदीकरण मोहिम राबविली. त्यामध्ये रुंदीकरणाच्या कामात अडसर ठरत असलेली बांधकामे हटविण्यात आली असून अशाप्रकारे अनेक रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात आले. मात्र, या मार्गावर बेकायदा वाहने उभी केली जात असल्यामुळे येथे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली आहे. कॅडबरी ते वर्तकनगर या मार्गावर हे चित्र दिसून येते. तसेच देवदया नगर येथील रस्ता आधीच अरूंद आणि



त्याच्या दुतर्फा बेकायदा वाहने उभी केली जातात. त्याचबरोबर फेरिवालेही तिथेच बसतात. यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. नितीन कंपनी ते कामगार नाका या रस्त्याचे काम गेल्या दोन ते तीन वर्षांपासून सुरू आहे. या कामासाठी कामगार नाकाहून नितीन कंपनीकडे येणारी मार्गिका वाहतुकीसाठी बंद ठेवली आहे. यामुळे नितीन कंपनीहून कामगारच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवरून दुहेरी वाहतूक सुरू आहे. त्यातच या मार्गावरही बेकायदा वाहने उभी केली जात आहेत. लोकमान्यनगर, सावरकरनगर, यशोधननगर, इंदिरानगर या परिसरातील नागरिक ठाणे स्थानकापर्यंतच्या वाहतुकीसाठी नितीन कंपनी मार्गाचा वापर करतात. त्यामुळे या मार्गावरून वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. मात्र रस्त्यावर बेकायदा उभ्या केलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. असेच चित्र शहरातील वर्तकनगर, शास्त्रीनगर, देवदया नगर, पवारनगर, यशोधननगर, रामचंद्रनगर, कामगारनाका, लोकमान्यनगर, नितीन कंपनी, वागळे इस्टेट, इंदिरानगर, उथळसर, कॅसलमील, कापूरबावडी, बाळकुम रोड या मार्गावर दिसून येते. शहरातील महामार्ग आणि सेवा रस्त्यांवर दुतर्फा वाहने उभी करण्यास पुन्हा सुरुवात झाली असून यामध्ये खासगी बस, टेम्पो, ट्रक, रिक्षा, कार या वाहनांचा समावेश आहे.

## आरोग्य भरती प्रक्रियेला अल्प प्रतिसाद

**नवी मुंबई (सतिश सोनावणे)-** नवी मुंबई शहरात करोना रुग्ण वाढत असून ६ हजारांहून अधिक रुग्ण उपचाराधीन आहेत. त्यामुळे



महापालिका प्रशासन बंद केलेली आरोग्य व्यवस्था खुली करीत आहे. मात्र मनुष्यबळ ही मोठी समस्या आहे. यासाठी ५२० पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मात्र तिला अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत केवळ ५० जणांनी अर्ज केले आहेत. २४ मार्चपासून तातडीने सेक्टर २२ तुर्भे येथील राधास्वामी सत्संग आश्रमामधील ४११ क्षमतेचे करोना समर्पित आरोग्य केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्याप्रमाणेच सेक्टर १९ तुर्भेमध्ये निर्यात भवन येथील ५१७ खाटांच्या क्षमतेचे आरोग्य केंद्रही कार्यान्वित करण्यात आले आहे. या दोन्ही ठिकाणी प्राणवायू खाटांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासोबतच कोणत्याही प्रकारची लक्षणे दिसत नसणाऱ्या अथवा सौम्य लक्षणे असणाऱ्या बाधितांसाठी करोना काळजी केंद्रे पुन्हा कार्यान्वित करण्यात येत आहेत. यात रहेजा गृहसंकुलात १ हजार तर इंडियाबुल येथे २ हजार खाटांचे काळजी केंद्र सुरू करण्यात येणार आहे. मात्र यासाठी आवश्यक मनुष्यबळ महापालिका प्रशासनाकडे उपलब्ध नाही. गेल्या वर्षीही तात्पुरत्या स्वरूपात मनुष्यबळ भरती करण्यात आली होती. मात्र करोनाची परिस्थिती अत्यंत नियंत्रणात आल्याने त्यांना कमी करण्यात आले होते. मात्र आता पुन्हा मोठी करोना रुग्णवाढ होत असल्याने ५२० इतके मनुष्यबळ भरती करण्यात येणार आहे. आरोग्य विभागांतर्गत प्रतिमाह ठोक मानधनावर कंत्राटी (करार) पद्धतीने पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. याला अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत फक्त ५० जणांचे अर्ज आले आहेत.

# वसई-विरारला कोरोनासह क्षयबाधेचाही घट्ट विळखा, दोन महिन्यांत ३३५ क्षयरुग्ण

**विरार (दिगंबर जाधव)-** क्षयरोग रुग्णांची माहिती दडवल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा मध्यंतरी वसई-विरार शहर महानगरपालिकेने दिला होता. मात्र, आता क्षयरोगाचा वसई-विरारकरांभोवती विळखा वाढत असताना महापालिकेकडे क्षयरोग तपासणी करणारा तज्ज्ञच नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

कोरोनासोबतच दोन महिन्यांत तब्बल ३३५ क्षयरोगाचे रुग्ण महापालिका हद्दीत आढळून आले आहेत. ऐन कोरोना महामारीच्या काळात क्षयरोगानेही डोके बाहेर काढले आहे. महापालिकेची आरोग्य यंत्रणा कोरोना प्रादुर्भावाशी लढण्यात व्यस्त असताना क्षयरोग रुग्णांची त्यात हेळसांड होत असल्याचे दिसून येते.

महापालिकेनेच दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षात २०२० मध्ये क्षयरोगाचे एकूण तीन हजार २५१ रुग्ण आढळून आले होते. त्यात १३७ रुग्णांचा मृत्यू झाला होता. नवीन वर्षाच्या सुरुवातीला जानेवारी ते फेब्रुवारी अशा दोन महिन्यांत म्हणजेच एकूण ६० दिवसांत क्षयरोगाचे तब्बल ३३५ रुग्ण आढळून आले आहेत. यात एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. शहरात असलेल्या झोपडपट्ट्यांत तसेच स्थलांतरित होऊन आलेले नागरिक यांच्यात क्षयरोगाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून क्षयरोगाच्या रुग्णांवर मोफत उपचार करण्याची तजवीज आहे.



सध्या वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत क्षयरोगाचे प्रमाण वाढत असताना मंजूर करण्यात आलेली आठ थुंकी तपासणी केंद्रे सुरूच झाली नसल्याची धक्कादायक माहिती आहे. पालिकेकडे क्षयरोगतज्ज्ञ नसल्याने पालिकेने दोन खासगी डॉक्टरांची नेमणूक केली आहे. विरार व वालीव अशा दोन केंद्रांत या डॉक्टरांची महापालिकेकडून वर्णी लावण्यात आली आहे. क्षयरोगाच्या उपचारासाठी महापालिकेकडून पुरविण्यात आलेल्या सुविधा मर्यादित असून त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे. क्षयरोगाच्या वाढत्या प्रादुर्भावावर उपाययोजना म्हणून महापालिकेने पाच युनिट तयार केले असून त्यात पाच निरीक्षक नेमले आहेत. तसेच केवळ २५ ते ३० कर्मचाऱ्यांवर शहरांचा भार सोपवण्यात आला आहे. पालिकेच्या तुळिंज व वालीव येथील केंद्रांत क्षयरोग निदानासाठी व्यवस्था करण्यात आली असली, तरी तुळिंज येथील केंद्रातील मशीन बंद असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे.

याआधी ओपीडींद्वारे होत असलेली क्षयरुग्णांची तपासणी कोरोनामुळे ऑगस्ट महिन्यापासून बंद आहे. क्षयरोग हा टीबीचा प्रकार असून त्यात मल्टीट्रग रेझिस्टंट क्षयरोग हा अतिशय धोकादायक ठरू शकतो. वसई-विरार महानगरपालिकेकडून क्षयरोगाचे निदान होण्यासाठी एकूण २१ तपासणी केंद्रे मंजूर झाली आहेत.

## करोनाबाधित नसाल तरच मॉलमध्ये प्रवेश

**नवी मुंबई (प्रतिनिधी)-** शहरातील करोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्या अंतर्गत दर आठवड्याच्या



अखेरीस मॉलमध्ये नागरिकांची होणारी गर्दी पाहता मॉलमध्ये प्रवेश करणाऱ्यांची अँटिजेन तपासणी करून आणि अहवाल निगेटिव्ह आला तरच त्या व्यक्तींना मॉलमध्ये प्रवेश देण्याच्या सूचना सर्वच मॉल व्यवस्थापनास देण्यात आल्या आहेत. त्यानुसार २६ मार्चपासून या आदेशाच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या ग्रँड सेंट्रल आणि इन ऑर्बिट मॉलकडून प्रत्येकी ५० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. सुट्टीच्या दिवशी शहरातील मॉलमध्ये गर्दी होते. यातील अनेक जण करोनासंबंधी सुरक्षा नियम पाळत नसल्याचे दिसून आले आहे. यावर उपाय म्हणून शुक्रवारी ४ वाजल्यापासून शनिवार व रविवार पूर्ण दिवस मॉलच्या प्रवेशव्दाराजवळ पालिकेतर्फे नागरिकांची अँटिजेन चाचणी होऊ लागली आहे. त्यामध्ये करोना चाचणी अहवाल निगेटिव्ह असेल किंवा मागील ७२ तासांमधील निगेटिव्ह कोव्हिड चाचणी अहवाल सादर केला तरच त्यांना मॉलमध्ये प्रवेश देण्यात येत आहे.

# फी एकरकमी भरा; शाळांची पुन्हा मनमानी

**ठाणे (शकिल शेख)-** करोनाच्या पार्श्वभूमीवर वर्षभरापासून शाळा बंद आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी ऑनलाइन वर्ग घेतले जात आहेत. पण शाळांच्या फीवरून गेल्या वर्षभरापासून वाद सुरू आहेत.



पुढील वर्षाची फी एकरकमी भरण्याचा तगादा पालकांकडे लावला जात आहे. ठाण्यातील काही शाळांचा मनमानी कारभार पुन्हा सुरू झाला असून एका शाळेने पुढील शैक्षणिक वर्षाची संपूर्ण फी ३१ मेपर्यंत भरण्यास पालकांना सांगितले आहे. याव्यतिरिक्त, दोन टर्मची फी वेगळी असून फीमध्ये १५ टक्केही वाढही करण्यात आली आहे. यामुळे पालकांमधून संतप्त भावना व्यक्त होत आहे. करोनाची साथ येण्यापूर्वी तीन महिन्यांची फी आगाऊ भरली जात होती. गेल्या वर्षी करोनाचा संसर्ग असताना, म्हणजेच शाळा बंद असताना आणि शाळेचे खर्च बरेचसे कमी असतानाही फी कमी झाली नाही. याउलट, फीमध्ये वाढ न करून आम्ही पालकांवर उपकारच करत आहोत, असेही शाळेतर्फे दाखवण्यात आल्याचा आरोप पालक संघटना करत आहेत. कम्प्युटर फीच्या नावाखाली यापूर्वी वर्षाला ६०० रुपये घेतले जात होते. गेले संपूर्ण वर्षभर शाळा बंद असूनही कम्प्युटर फी घेतली गेलीच. तसेच फी भरण्यासाठी ठराविक ऑनलाइन ॲपचाच वापर करण्याचा अट्टहास शाळेकडून केला जात असल्याचे पालकांनी सांगितले. येत्या शैक्षणिक वर्षातही शाळा कधी भरेल हे अद्याप स्पष्ट नाही. अशा परिस्थितीत, संपूर्ण वर्षाची फी आगाऊ भरण्याची अट का टाकली जात आहे, असा सवाल पालकवर्गातून केला जात आहे. शिवाय १५ टक्के फी वाढविण्यातही आलेली आहे. करोनाच्या संकटामुळे अनेक पालकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत, उत्पन्नावर परिणाम झाला आहे.

## तरुणीवर सामूहिक अत्याचार; आरोपी जेरबंद

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)-** खारघर येथील सामूहिक बलात्कार प्रकरणातील फरार असलेल्या मुख्य आरोपीला चेंबुर येथून अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. अभिषेक अजित खरात (३१) असे या आरोपीचे नाव असून ३ फेब्रुवारीला अभिषेक आणि त्याचा साथीदार तेजस देवळेकर (१९) या दोघांनी १९ वर्षीय तरुणीवर सामूहिक बलात्कार करून पलायन केले होते. त्यानंतर पोलिसांनी तेजसला अटक केली होती. मात्र अभिषेक फरार झाला होता. पीडित तरुणी व तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार करणारे आरोपी हे सर्व खारघरमध्ये एकाच भागात राहाणारे असून ते पीडित तरुणीच्या ओळखीतले होते. ३ फेब्रुवारी रोजी रात्री पीडित तरुणी आई-वडिलांसह हळदीच्या कार्यक्रमासाठी गेली होती. यावेळी तरुणीला तहान लागल्याने ती पाणी पिण्यासाठी



गेली असताना, आरोपी अभिषेक व तेजस या दोघांनी तिला जवळच असलेल्या मिनी बसमध्ये नेऊन शीतपेयात दारू मिसळून तीला पिण्यासाठी दिले होते. त्यामुळे ही तरुणी बेधुंद झाल्यानंतर दोघांनी बसमध्येच तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला होता.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# 'लोकांनी ऐकलं नाही तर मुंबईत कोरोनाचा स्फोट होईल: कडक लॉकडाऊनशिवाय पर्याय नाही'



**मुंबई (दिपेश गोरिवले)-** शहरात वाढणाऱ्या कोरोना रुग्णाच्या संख्येमुळे मुंबईत कडक लॉकडाऊन लागण्याची भीती सर्वसामान्यांना पडली आहे. कारण लॉकडाऊन लागलं तर त्याचा आर्थिक फटका सगळ्यांनाच सहन करावा लागणार आहे. यासंदर्भात आज संध्याकाळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत मुंबईत लॉकडाऊन लावावा की कडक निर्बंध आणवेत यावर चर्चा होणार असल्याची माहिती पालकमंत्री अस्लम शेख यांनी दिली आहे. याबाबत अस्लम शेख म्हणाले की, भारतात अनेक लोकं रोजंदारीवर पोट भरतात, छोट्या छोट्या हॉटेलमध्ये काम करतात, स्थलांतरित कामगारांच्या जेवणाची व्यवस्था मागील लॉकडाऊनमध्ये महापालिकेकडून करण्यात आली होती. अशीच परिस्थिती आली तर काय करावं लागेल याचा विचार सरकार करत आहे, संध्याकाळच्या बैठकीत सरकारवर यावर निर्णय घेईल असं अपेक्षित आहे. आपल्याकडे खासगी हॉस्पिटलची क्षमता संपत आलेली आहे, २१०० पर्यंत बेड्स उपलब्ध करून



देण्याची तयारी सुरु आहे. पण कुठेतरी कोरोनाची साखळी ब्रेक झाली पाहिजे, गरज असेल तरच लोकांनी घराबाहेर पडावं असं त्यांनी सांगितले. त्याचसोबत लॉकडाऊनसारखी परिस्थिती आली तर गरिबांना किमान पैसे द्यावे लागतील किंवा काहीतरी त्यांच्यासाठी करावं लागणर आहे. एवढ्या मोठ्या संख्येने मुंबईत हॉटेल आहेत, त्याठिकाणी काम करणारे कर्मचारी, अनेक कारखान्यात काम करणारे मजूर ही सगळी परिस्थिती लक्षात घेऊन आज बैठक होणार आहे, कोरोनाची परिस्थिती गंभीर होत आहे, आपण सगळ्या सुविधा वाढवू शकतो परंतु आरोग्य यंत्रणेवरील ताण कमी कसा करायचा? मुंबईची परिस्थिती गॅससारखी झाली आहे, वेळीच रोखलं नाही तर कोरोनाचा स्फोट होईल अशी भीती पालकमंत्री अस्लम शेख यांनी व्यक्त केली. दरम्यान, आठ वाजल्यानंतर आपण लॉकडाऊनसारखी अंमलबजावणी केली आहे, मॉल्स, रेस्टॉरंट बंद करणं बंधनकारक केले आहे. झोपडपट्टीऐवजी मोठ्या कॉम्प्लेक्समध्ये कोरोनाचा प्रार्दुभाव वाढतोय, त्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंटमधील गर्दीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न आहे.

## मुंबईत नाका कामगारांचा तुटवडा

**मुंबई (राकेश गायकवाड): शिथिलीकरणानंतर मुंबईत दाखल झालेल्या परप्रांतीय मजुरांमुळे मुंबईतील नाके पुन्हा गजबजले होते. परंतु गेल्या दोन महिन्यांत परप्रांतीय मजुरांनी गावची वाट धरल्यामुळे कामगारांचा तुटवडा भासू लागला आहे. मुंबईत परतल्यानंतरही हाताला काम नसल्याने आणि करोनाबाधित रुग्णांची संख्या वाढल्याने अनेकांनी मुंबईला रामराम ठोकला आहे. परिणामी, हक्काचे मजूरच नसल्याने बांधकाम क्षेत्रात अनेक अडचणी येत असल्याचे कंत्राटदरांचे म्हणणे आहे.**

प्रत्येक कंत्राटदाराकडे त्याचे हक्काचे मजूर काम करीत असतात. परंतु काही मजूर अद्याप गावावरून परतलेले नाहीत. जे आले होते, तेही गावी गेल्याने कंत्राटदारांनाच मजुरांची प्रतीक्षा असल्याची स्थिती आहे. तर घरातील किरकोळ दुरुस्तीच्या कामांसाठी मुंबईकरांना कामगार नाक्यावर मजूर



मिळेनासे झाले आहेत. 'मजूर कमी असल्याने लहानसान कामासाठी ते येत नाहीत. नाक्यावरील कामगार १००-२०० रुपयांच्या कामासाठी ८०० रुपये मजुरी मागतात. मोठे काम असल्यास मनमानी भाव सांगितला जातो,' असे दादर नाक्यावर कढियाच्या शोधत आलेल्या एकाने सांगितले.

'गेल्या महिनाभरात मजूर गावी जाण्याचे सत्र सुरू आहे. पूर्वी दादर नाक्यावर गर्दी असायची आता दोन-चार मजूर उभे असतात.आम्हालाही पैशांची गरज असल्याने छोटय़ा-मोठय़ा कामावर दिवस ढकलण्यापेक्षा जास्त मजुरी मिळेल तीच कामे स्वीकारतो,' असे नाक्यावरील कामगार रमेश शर्मा याने सांगितले. 'धारावी नाक्यावर पूर्वी ४०० मजूर जमायचे. आता केवळ १००-१५० मजूर तेथे येतात. काही महिन्यांपूर्वी काम नव्हते, पण मजूर होते. आता काम आहे, पण मजूर नाहीत. रुग्ण वाढत असल्याने आम्हीही गावी जाण्याच्या तयारीत आहोत,' असे धारावीतील नाक्यावरील बांधकाम मजूर प्रदीप जैस्वर यांनी सांगितले.

## मुंबईत तरुणाई ठरतेय कोरोनाची 'सुपरस्प्रेडर'

**मुंबई (विशाल पाटील)-** मुंबईत तरुण वर्गाला कोरोना व्हायरसचा मोठ्या प्रमाणावर संसर्ग होत आहे. लॉकडाउन शिथील झाल्यापासून आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर सुरु केल्यापासून युवा वर्गाला कोरोनाची मोठ्या प्रमाणावर बाधा होत आहे, असे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले आहे. या वर्गामध्ये कोरोना पॉझिटिव्ह असूनही आजाराची लक्षण दिसत नाहीत, किंवा दिसलीच तर सौम्य लक्षणे दिसतात. हा युवा वर्गच कोरोना सुपर स्प्रेडर ठरत असून त्यांच्यापासून वृद्धांना कोरोनाची बाधा होत आहे. याच वर्गाला कोरोनापासून गंभीर धोका आहे. मुंबई महापालिकेच्या डाटानुसार, ३० ते ४९ वयोगटातील नागरिकांना सर्वाधिक कोरोनाचा संसर्ग होत आहे. याच वयोगटातील आतापर्यंत दीड लाख लोकांना कोरोनाची बाधा झाली आहे. ५० ते ६९ वयोगटाला कोरोनापासून सर्वाधिक धोका



आहे. या वयोगटातील नागरिक विविध व्याधींनी ग्रस्त असतात. ५० ते ६९ वयोगटात १ लाख २८ हजार नागरिकांना कोरोनाची बाधा झाली आहे. कोरोनाची रुग्णसंख्या मुंबईत झपाट्याने वाढतेय. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी जास्त काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यांनी बाहेर प्रवास करणे टाळले पाहिजे. युवा वर्गापेक्षा ज्येष्ठ नागरिक कोरोना नियमांचे जास्त काळजीपूर्वक पालन करतात, असे निरीक्षण महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नोंदवले आहे. युवा वर्गा नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने जास्त घराबाहेर पडतो, त्यामुळे हा वर्ग कोरोनाच्या प्रसारास कारणीभूत ठरतोय. युवा वर्गाला कोरोना झाला, तरी त्याची लक्षणे सौम्य दिसतात. ते चांगलं आहे. पण तरुणाई ज्येष्ठांसोबत राहते. त्यामुळे त्यांच्यापासून वुद्धांपर्यंत कोरोना पसरतो. आतापर्यंत कोरोनाच्या साथीमध्ये ज्येष्ठ नागरिकांचा सर्वाधिक मृत्यू झाला आहे याकडे डॉक्टरांनी लक्ष वेधले.

## लसीकरणासाठी ४५ वर्षावरील नागरिकांचा उत्साह कमी

**मुंबई (प्रतिनिधी)-** महाराष्ट्रात करोनाची दुसरी लाट आल्यामुळे सर्वत्र चिंतेचं वातावरण पसरलं आहे. यामध्येच एकीकडे कोरोनाग्रस्तांची संख्या वाढल्याचं दिसून येत आहे. तर, दुसरीकडे लसीकरणाचा वेगदेखील वाढवल्याचं पाहायला मिळत आहे. आतापर्यंत वयवर्ष साठ वर्षावरील आणि



सहव्याधी व्यक्तींना कोरोनाची लस देण्यात येत होती. मात्र, सहव्याधी आता १ एपिलपासून ४५ वर्षांवरील सर्व नागरिकांना लस देण्यास सुरुवात झाली. मुंबई १०८ केंद्रांवर ही मोहीम सुरू झाली असून या मोहिमेला ४५ वर्षांवरील व्यक्तींचा प्रतिसाद कमा असल्याचं पाहायला मिळत आहे. १ एप्रिलपासून सुरु झालेल्या लसीकरणाच्या तिसऱ्या टप्प्यात ४५ वर्षांपुढील सर्व नागरिकांना लसीकरणाची मुभा देण्यात आली असून अधिकाधिक नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होण्याचं आवाहन शासनाकडून करण्यात येत आहे. मात्र, या मोहिमेला ज्येष्ठ नागरिकांच्या तुलनेत ४५ वर्षांवरील व्यक्ती कमी प्रतिसाद देत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, कोरोनाग्रस्तांची वाढती संख्या लक्षात घेता प्रशासनाकडून लसीकरणाच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. तसंच नागरिकांना जास्तीत जास्त लसीकरणाचा लाभ घेता यावा यासाठी सुट्टीच्या दिवशीही लसीकरण करण्यात येत आहे. मात्र, तरीदेखील ४५ वर्षांवरील व्यक्ती लसीकरणासाठी फारसे उत्साही दिसत नसल्याचं पाहायला मिळत आहे. त्यातच गेल्या २ ते ३ दिवसांपासून लसीकरण करणाऱ्यांच्या संख्येत घट झाल्याचं समोर आलं आहे.

## 'म्हाडा आता विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधणार'; जितेंद्र आव्हाडांची घोषणा

**मुंबई (सम्यक कासारे)-** गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली आहे. म्हाडा आता विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधणार असल्याची माहिती दिली आहे. 'कॅन्सरच्या उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांची




तात्पुरती राहण्याची व्यवस्था केल्यानंतर म्हाडा आता विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधणार आहे. मुंबई शहरामध्ये ४ ठिकाणी असे वसतिगृह बांधण्यात येतील. त्याच्यातील पहिल्या वसतिगृहाची सुरुवात काळाचौकी, जिजामाता नगर येथे करण्यात येईल' अशी माहिती आव्हाड यांनी दिली आहे. जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्विट केलं आहे. 'सरकारच्या असे निदर्शनास आले आहे की, मुंबई, ठाण्यामधील म्हाडा कॉलनीमध्ये एक-एका इमारतीचा विकास करण्यासाठी म्हणून विकासकाने तिथल्या रहिवाशांबरोबर समझोता करार केला आहे. पण अनेक वर्षे या इमारतींचा विकास न-करता तसेच रहिवाशांना भाडे न-देता मुजोरपणाची वागणूक हे विकासक करीत आहेत. यापुढे ५ वर्षांपेक्षा अधिक जर विकासकाने इमारतीचे काम रोखून ठेवले. तर म्हाडाला ती इमारत स्वत: डेव्हलप करेल आणि विकासकाचा करार रद्द समजण्यात येईल' असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. 'राज्यात केवळ सात-आठ दिवस पुरेल इतका रक्तसाठा उरला आहे. आज कोरोनाला न घाबरता, सोशल डिस्टसिंग पाळून खासकरुन तरुण-तरुणींनी बाहेर पडून रक्तदान करावे. कुणाचे तरी प्राण वाचविण्यासाठी आपलं रक्त उपयुक्त ठरेल, ही भावना मनात ठेवून रक्तदान करा' असं देखील जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.

## भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी अतिरिक्त संस्थांची कुमक

**मुंबई (विशाल कारंडे)-** मुंबई महापालिकेने पुढील तीन वर्षांमध्ये तब्बल ९० हजार भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र उपलब्ध मनुष्यबळ आणि निर्बीजीकरण करण्यासाठी नियुक्त संस्थांची संख्या लक्षात घेता नियोजित कालावधीत हे काम पूर्ण होण्याची शक्यता धुसर बनली आहे. परिणामी, भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी अतिरिक्त संस्थांची



नियुक्ती करण्याची नामुष्की पालिकेवर ओढवली आहे. भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे मुंबईकर हैराण झाले आहेत. मुंबईतील अनेक भागांमध्ये रात्रीअपरात्री आक्रमक होऊन अंगावर येणाऱ्या भटक्या कुत्र्यांची संख्या मोठी आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. परिणामी, भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी सातत्याने मुंबईकरांकडून करण्यात येते. मात्र भटक्या कुत्र्यांना ठार करू नये असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या आदेशाची दखल घेत पालिकेने भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करुन त्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. गेली अनेक वर्षे निर्बीजीकरणाची मोहीम राबविण्यात येत आहे. प्राणीप्रेमी संस्थांच्या मदतीने हे काम करण्यात येत आहे. मात्र पालिकेला निर्बिजीकरणाचे उद्दीष्ट साध्य करता आलेले नाही. मुंबईत साधारण दोन लाख ५० हजारांहून अधिक भटके कुत्रे आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये यापैकी सुमारे ९० हजार कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले. उर्वरित एक लाख ६० हजारपैकी ९० हजार कुत्र्यांचे पुढील तीन वर्षांमध्ये निर्बीजीकरण करण्याचा संकल्प पालिकेने सोडला आहे. दरवर्षी ३० हजारप्रमाणे ९० हजार भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्याचे काम पूर्ण करण्याचा पालिकेचा मानस आहे.

## नव्या निर्बंधांमुळे रिक्षा-टॅक्सीचालक चिंतेत

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** करोना प्रतिबंधासाठी जारी करण्यात आलेल्या नव्या निर्बंधांमुळे रिक्षा-टॅक्सीवर उदरनिर्वाह अवलंबून असलेले लाखो चालक-मालक अस्वस्थ झाले आहेत. पुन्हा टाळेबंदी लादली जाणार या अफवेने चालकवर्गातील अनेकांनी आधीच मुंबईला रामराम ठोकला असून नव्या निर्बंधांमुळे दुसऱ्या पाळीतील व्यवसाय कोलमडल्याने उर्वरित चालक मंडळी गावी जाण्याच्या तयारीत आहेत. रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या दाव्यानुसार अनेक चालक-मालक व्यवसाय बंद करून गावी निघून जात आहेत. टाळेबंदीची अफवा त्यास कारणीभूत ठरत आहे. त्यासोबतच रात्री आठ ते सकाळी सात या वेळेतील नव्या निर्बंधांमुळे दुसऱ्या पाळीत बाहेर पडलेल्या चालकांना ग्राहक नसल्याने रिकाम्या हाती घरी परतावे लागते. व्यवसाय होणार नसेल



तर वाहन एकाच पाळीत चाललेले बरे या विचाराने अनेक मालकांनी दुसरी पाळी बंद केली. परिणामी अनेक चालक बेरोजगार होत आहेत. मुंबईत सुमारे ४८ हजार टॅक्सी तर चार लाख रिक्षा आहेत. ही वाहने सकाळ आणि रात्र अशा दोन पाळ्यांमध्ये रस्त्यावर धावत असतात. एका पाळीत मालक तर दुसऱ्या पाळीत चालक वाहन चालवतो. काही वाहने दोन्ही पाळ्यांमध्ये चालकांच्या हाती असतात. त्यामुळे जितकी वाहने तितके चालक या व्यवसायावर अवलंबून आहेत. बहुतांश चालक वर्ग उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमधील आहेत. मुंबई टॅक्सीमन युनियनचे ए. एल. क्वाड्रॉस यांच्या माहितीनुसार, एप्रिलच्या मध्यावर परराज्यातील अन्य मजुरांप्रमाणे टॅक्सी-रिक्षा चालकांचीही गावी जाण्याची लगबग सुरू होते. यंदा मात्र मार्च महिन्यातच सुमारे ६० टक्के चालक-मालक गावी गेले आहेत. टाळेबंदीची अफवा होतीच, पण रात्रीचे निर्बंध लागू झाल्यानंतर चालक गावी जाण्याचे प्रमाण वाढले आहे, असे स्वाभिमान रिक्षा युनियनचे के. के. तिवारी यांनी सांगितले.

## लॉकडाउन विरोधात मुंबईत हॉटेल मालक उतरले रस्त्यावर

**मुंबई (प्रतिनिधी)-** मुंबईत लॉकडाउन होण्याची शक्यता आणि हॉटेल उद्योगावर लादलेल्या निर्बंधांविरोधात मुंबईत आज हॉटेल मालकांनी निदर्शने केली. मुंबईत सध्या दररोज पाज हजारपेक्षा जास्त रुग्ण आढळत आहेत. त्यामुळे राज्य सरकारने हॉटेल्सवर काही निर्बंध टाकले आहेत. पहिल्या लॉकडाउनमध्ये नुकसानीचा सामना करणाऱ्या हॉटेल चालकांनी रात्रीच्या निर्बंधांविरोधात आवाज उठवला आहे. जोगेश्वरी पश्चिम आणि ओशिवरामधील हॉटेल चालकांनी शांततामय मार्गाने निदर्शने केली. रात्री आठ नंतर हॉटेल बंद म्हणजे व्यवसाय बंद असे त्यांनी निदर्शने फलकांवर लिहिले होते. नो लॉकडाउन प्लीज, आमच्या नोकऱ्या वाचवा अशा घोषणा हॉटेल चालकांनी फलकावर लिहिल्या होत्या. हॉटेल क्षेत्रात काम करणारे पुरुष आणि महिला दोघेही या




निदर्शनांमध्ये सहभागी झाले होते.

लॉकडाउनला विरोध करणारे संजय निरुपम हॉटेल चालकांचे शिष्टमंडळ घेऊन ओशिवरा पोलीस ठाण्यात गेले होते. रात्री आठ ते सकाळी सात या वेळेत हॉटेल्स, सिनेमा हॉल बंद असतात. फक्त पार्सलना परवानगी दिलेली आहे. 'मिशन बिगिन अगेन अंतर्गत आम्हाला सर्वात शेवटी परवानगी देण्यात आली होती. मागच्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात रेस्टॉरन्टसना परवानगी देण्यात आली होती. मर्यादीत ग्राहकसंख्येसह ही परवानगी दिली होती. नववर्षाच्या पूर्वसंध्येलाही अशाच प्रकारचे निर्बंध घातले.

## टाळेबंदीतही घर खरेदीकडे कल



**मुंबई (योगेश होळंब)- करोना आणि टाळेबंदीमुळे सर्वच क्षेत्रांत मंदीचे चित्र दिसत असले तरी बांधकाम क्षेत्राला मात्र काहीसा दिलासा मिळाला आहे. मुद्रांक शुल्कातील कपात, गृह कर्जाच्या व्याजदरातील घट यामुळे टाळेबंदीतही नागरिकांचा घरखरेदीकडे कल होता. यातून मुंबईसह, नवी मुंबई आणि ठाणे परिसरांतील विक्रीच्या प्रतीक्षेतील घरांच्या संख्येत यंदा जानेवारी ते मार्च या तिमाहीत आठ टक्क्यांची घट झाली आहे.**

मुंबई आणि आसपासच्या परिसरांत गेल्या वर्षी पहिल्या तिमाहीत दोन लाख १३ हजार घरे विक्रीच्या प्रतीक्षेत होती. त्याआधी काही कालावधीपासून बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे व्यावसायिकांच्या चिंतेत भर पडली होती. त्यानंतर करोनामुळे गेल्या वर्षी मार्चमध्ये लागू झालेल्या टाळेबंदीने व्यावसायिकांच्या चिंतेत आणखी भर पडली. मात्र टाळेबंदी शिथिलीकरणाबरोबर सरकारने मुद्रांक शुल्कात डिसेंबपर्यंत तीन टक्क्यांची आणि जानेवारी ते मार्च २०२१ या कालावधीसाठी २ टक्क्यांची सवलत दिली. त्याचबरोबर बांधकाम व्यावसायिकांनीही ग्राहकांना भरघोस सवलत जाहीर केली होती. त्यातून ऑक्टोबर २०२० पासून ते मार्च २०२१ अखेपर्यंत घरांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली. त्यातून यंदा शिल्लक घरांमध्ये गेल्या वर्षीच्या जानेवारी ते मार्च या तिमाहीच्या तुलनेत सुमारे १६ हजारांनी घट झाली आहे. सद्य:स्थितीत मुंबई आणि परिसरात १ लाख ९७ हजार घरे विक्रीच्या प्रतीक्षेत आहेत. ॲनारॉक संस्थेच्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे. देशपातळीवरील इतर प्रमुख शहरांच्या तुलनेत मुंबईतील विक्रीच्या प्रतीक्षेत असलेल्या घरांमध्ये मोठी घट झाल्याचे संस्थेने नमूद केले आहे. मुंबईमध्ये गेल्या वर्षी जानेवारी ते मार्च या पहिल्या तिमाहीत एक लाख ३९ हजार ५९० घरे विक्रीच्या प्रतीक्षेत होती. त्यामध्ये ५ टक्के घट झाली असून यंदा मुंबईत एक लाख ३३ हजार २४० घरे शिल्लक आहेत. मुंबई महानगर प्रदेश परिसरात ठाणे परिसरात विक्रीच्या प्रतीक्षेतील शिल्लक घरांच्या संख्येत सर्वाधिक १४ टक्क्यांची घट नोंदविली गेली आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते मार्च या तिमाहीत ठाण्यात ३२ हजार ७४० घरांची विक्री झाली नव्हती. त्यात घट होऊन यंदा सुमारे २८ हजार घरे विक्रीच्या प्रतीक्षेत आहेत, तर नवी मुंबई परिसरात गेल्या वर्षी जानेवारी ते मार्च या तिमाहीत ४० हजार ८५० घरांची विक्री होऊ शकली नव्हती. त्यामध्ये यंदा १२ टक्क्यांची घट झाली असून सद्य:स्थितीत ३५ हजार ८०० घरांची विक्री झालेली नाही.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
बहुमजली इमारती बांधकाम विभाग,
प्रशासकीय इमारत, पहिला मजला, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.

**जा.क्र.काअ/बइबांवि/५८५/२०२१** ☎ ०२२-२५२२० ७ ०२२-२५२२४०६०
Email: mWckurla.ee@mahapwd **दिनांक: २४/०३/२०२१**

**ई-निविदा सूचना क्र. १४ सन २०२०-२१**

कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई- ७१, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून १ कामाकरीता बी-१ नमुन्यातील ई-निविदा मागवित आहोत. ई-निविदा बाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in पहायला मिळेल. तसेच ई-निविदा दिनांक ३०/०३/२०२१ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १६/०४/२०२१ रोजी १७.३०पर्यंत या कालावधीत उपरोक्त संकेत स्थळावरून डाऊनलोड करता येईल. सदर कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक ०९/०४/२०२१ रोजी १५.०० वाजता मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई यांचे कायालयात घेण्यात येईल. सदर ई-निविदा दिनांक २०/०४/२०२१ रोजी १५.०० वाजता शक्य झाल्यास अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, मुंबई-७१ यांचे कार्यालयात उघडण्यात येईल

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकारी कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | Construction of Concrete Pavements of Balance Bituminous Stretches on Sion-Panvel Haighway from Kalamboli Junction (Ch.115/800) to BARC Junction (Ch. 140/690) | 30,82,34,882/- |

खालील संकेतस्थळावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)
3) कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई- ७१, कार्यालयातील सूचना फलक.

कार्यकारी अभियंता,
बहुमजली इमारती बांधकाम विभाग
चेंबूर, मुंबई- ७१

**डीजीआयपीआर/२०२०-२०२१/३२०७**

# यंदाचा उन्हाळा असणार अधिक 'ताप'दायक; २०२१ तापमानवाढीचा उच्चांक मोडणार

**मुंबई (विशाल कारंडे)-** भारतीय हवामान शास्त्र विभागाने मे २०२१पर्यंत देशात उष्ण लहरींचे प्रमाण वाढणार असल्याचा इशारा दिला असून, २०१५ ते २०२० या वर्षांप्रमाणेच २०२१ हे वर्षही अति तापमानाचे आणि उष्ण लहरींचे वर्ष ठरणार आहे. मार्च महिन्यातच वाढत्या उन्हाने मुंबईकरांना घाम फोडला. मुंबईसह कोकणात दाखल झालेल्या उष्णतेच्या लाटेने नागरिक होरपळले होते. आता एप्रिल आणि मे हे महिनेही तापदायक ठरणार आहे. २०२१ हे वर्ष तापमान वाढीचा उच्चांक मोडणार एप्रिल-मे महिन्यात सर्वाधिक उष्ण लहरींचा धोका आहे. मध्य भारत, उत्तर, पूर्व भारतात सरासरीपेक्षा अधिक तापमान राहणार आहे. ओडिशा, झारखंड येथे दिवसाचे तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंश पेक्षा अधिक असेल. दिल्ली, चंदिगढ, उत्तर प्रदेश, हरियाणा येथे दिवस आणि रात्रीचे तापमान व उष्ण लहरींचे प्रमाण वाढेल. हिमाचल प्रदेश, कच्छ, राजस्थान, उत्तराखंड, मेघालय, अरुणाचल, सिक्कीम, मिझोरम, मणिपूर, बिहार या प्रदेशातही तापमान वाढलेले असेल. दक्षिण भारतात तेलंगणा, केरळ,



तामिळनाडू, कर्नाटक, विदर्भ आणि महाराष्ट्रातील काही प्रदेशांत तापमान ०.५ अंशांपेक्षा अधिक राहील. नासाच्या सर्वेक्षणानुसार २०२० हे वर्ष सर्वाधिक तापमानाचे वर्ष ठरले. आता जागतिक तापमान १ अंशाने वाढले आहे. पृथ्वीचे सरासरी तापमान भविष्यात २ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. तापमान १.५ अंश राहिले तरी भारतात प्रचंड उष्ण लहरींचा प्रकोप वाढेल. सर्वाधिक तापमान दक्षिण आशियात वाढेल. उष्ण लहरींची सुरुवात २०१५ पासून झाली. २०१९ मध्ये भारत आणि पाकिस्तानात आतापर्यंतची पाचवी सर्वाधिक उष्ण लहर आली, त्यामुळे ३५०० लोकांचा मृत्यू झाला होता, असे ग्रीन पृ नेट सोसायटीचे अध्यक्ष प्रा. सुरेश चोपणे यांनी सांगितले. १४ एप्रिल १९५२ रोजी मुंबईचे कमाल तापमान ४२.२ एवढे नोंदविण्यात आले होते. आतापर्यंतचे हे सर्वाधिक कमाल तापमान आहे. जंगलतोड, शहरीकरण आणि प्रदूषण या घटकांमुळे भविष्यात पुन्हा तापमानवाढ आणि उष्ण लहरींचा धोका निर्माण होईल, अशी भीती पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. गेल्या २४ तासांत कोकण आणि गोव्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. किमान तापमान देखील वाढले आहे.

# शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्टचे अमोल साईनवार यांना २०२० चा अंत्योदय पुरस्कार प्रदान

**मुंबई (प्रियांका निर्गुण):** सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजासाठी विधायक कामे करणाऱ्यांची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. सामाजिक कार्यकर्ते अमोल साईनवार हे त्यापैकीच एक नाव. शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल या राज्यातून ग्रामीण व शहरी भागातील मुलांच्या शिक्षणासाठी तसेच महाराष्ट्रातील काही जिल्हयात ग्रामविकासासाठी कार्यरत आहेत. आतापर्यंत सुमारे ७०० हून अधिक मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १० शाळांना डिजीटल करणे, शौचालय बांधणे, वैद्यकीय सेवा पुरविणे अशा विविध कार्यातून अमोल साईनवार सक्रिय आहेत. त्याच बरोबर शिवप्रभा शेतकरी क्लबच्या माध्यमातून शेतकऱ्यांनो शेतकरी जगावा, शिवप्रभा कल्याण योजना, प्राथमिक आणि उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून समाजाला सक्षम करण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. आजमितीस ८ राज्यातील ३२ जिल्ह्यात त्यांचे कार्य सुरु आहे.



शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक व सामाजिक कार्यकर्ते अमोल साईनवार हे मुंबईतील डी.एच.गोखले न्यासाच्या निधीतून आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने दिल्या जाणाऱ्या 'अंत्योदय पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. मागील वर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा पुरस्कार प्रदान केला नसल्यामुळे यंदा हा पुरस्कार छोटेखानी कार्यक्रमाच्या स्वरुपात, सोमवार, दि. ५ एप्रिल २०२१ रोजी साईनवार यांच्या ठाणे येथील निवास स्थानी पार पडला. एक लाख रुपये रोख, मानचिन्हे, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असून डी.एच.गोखले न्यासाच्या चंदा गोखले (आगाशे), एन. वेणुगोपाल आणि प्रबोधिनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवी पोखरणा आणि मुख्य देखभाल व संकुल सेवा अधिकारी उमेश मोरे यांच्या उपस्थितीत अंत्योदय पुरस्काराचा कार्यक्रम संपन्न झाला. अमोल साईनवार यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना 'शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्टच्या कामाची दखल घेत कौटुंबिकरित्या अंत्योदय पुरस्कार देऊन सत्कार केल्याबद्दल डी.एच. गोखले न्यास आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी या दोन्ही संस्थाना व पदाधिकाऱ्यांना खूप – खूप धन्यवाद देत आभार मानले.' अंत्योदय पुरस्काराची संपूर्ण रक्कम राम मंदिराच्या निर्माणासाठी देण्यात येणार असल्याचे त्यांनी घोषित केले.

सन २००० पासून दिला जाणारा हा पुरस्कार आतापर्यंत श्री. गिरीश प्रभुणे, डॉ. श.शं. कुलकर्णी, डॉ. अविनाश आचार्य, श्रीमती सुनंदा पटवर्धन, डॉ. सतीश कुलकर्णी, डॉ.बाबा नंदनपवार, मेळघाटात कार्य करणारे सुनिल व निरुपमा देशपांडे, स्नेहालयचे डॉ. गिरीश कुलकर्णी, रामोशी – बेरड समाजाच्या विकासासाठी कार्य करणारे डॉ. भीमराव गस्ती. श्री. भिवा (दादा) गावकर, नारायणराव देशपांडे, प्रदीप वडनेरकर, सेरेबल पाल्सीग्रस्त मुलांसाठी कार्य करणारे सुरेश पाटील, वर्षा परचुरे यांना देण्यात आला आहे.

# 'बुद्धांच्या संस्कारक्षम गोष्टी'

मुलांच्या संस्काराचा पाया हा मूलत: लहान वयातच रचणे गरजेचे असते. कुंभार ज्याप्रमाणे ओल्या मातीच्या गोळ्याला आकार देऊन त्यापासून सुरेख मडक्याची घडण बनवतो अगदी त्याचप्रमाणे लहान वयातच मुलांच्या व्यक्तिमत्वाला आकार देणे गरजेचे आहे. बालपणीच त्यांच्या मनावर संस्कारांचे बीज रोवले तर त्यानुसार त्यांची पुढील वाटचाल यशस्वीपणे योग्य दिशेस चालू रहात असते. आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक पालकांना कामाच्या प्रचंड व्यापामुळे, मुलांकडे संपूर्ण लक्ष देणे शक्य होत नाही. त्यामुळे मुलांना खेळणी, मोबाईल अशा भौतिक वस्तूंमध्ये गुंतवून ठेवले जाते. मोबाईलचे नाविन्य हे नेहमीच मुलांसाठी आकर्षणाचे केंद्रस्थान राहिले आहे . मोबाईलच्या याच आकर्षणाचे व्यसनात रुपांतर होते आणि यांचे दुष्परिणाम आपल्याला ज्ञातच आहेत. आपल्या मुलांवर चांगले संस्कार होण्यासाठी सर्वाधिक महत्वाचे आहे की, अतिशयोक्ती, अंधश्रद्धेवर आधारित अशा गोष्टी ज्या मुलांची बौद्धिक ज्ञानाची पातळी खालावतील अशा साहित्यापासून त्याना दुर ठेवणे. मुलांच्या विरंगुळ्यासाठी केवळ मनोरंजनापेक्षा, ज्या गोष्टीतून त्यांच्यावर चांगले विचार, ज्ञान,सकारात्मक तात्पर्य, नैतिकतेचे संस्करण होईल अशा साहित्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून आपल्या मुलांसाठी थोडा वेळ काढून,त्यांना संस्कारक्षम मार्गदर्शन मिळेल अशा गोष्टींची आवड निर्माण करण्यासाठी पालकांनी थोडे परिश्रम घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. कारण संस्कार हा व्यक्तिमत्त्वाचा पाया आहे जो बालपणीच मुलांच्या मनावर बिंबवला पाहिजे.

लहान मुलांचे मनोरंजन होईल व त्यांच्या मनावर चांगले संस्कारही होतील असे माझ्या वाचनात आलेले पुस्तक म्हणजे 'बुद्धांच्या संस्कारक्षम गोष्टी'. प्रस्तुत पुस्तक हे डॉ.आ. ह. साळुंखे यांच्या 'सर्वोत्तम भूमिपुत्र: गोतम बुद्ध' या प्रसिद्ध ग्रंथातील निवडक व संस्कारक्षम अकरा गोष्टींचे संपादन केलेले पुस्तक आहे. या पुस्तकाचे लेखक सागर शिंगणे यांनी तथागत बुद्ध या आपल्या जिवलग पूर्वजाला समजून घेऊन त्यांच्या जीवनप्रसंगातील गोष्टीतून पुढील पिढीस योग्य मार्गदर्शन व्हावे,चांगल्या संस्काराचे पुढे मार्गक्रमण व्हावे म्हणून हे पुस्तक आपल्या समोर सादर केले आहे. या पुस्तकातील आशय हा सरळ, साध्या,सोप्या भाषेत मांडलेला आहे जो लहान मुलांना ही वाचायला सोपे जाईल. तसेच गोष्टींमधील कठीण शब्दप्रयोगाचे अर्थ देखील नमूद करण्यात आलेले आहेत. जेणेकरून त्या शब्दाचा अर्थ माहित नसल्यास त्या शब्दाचा अर्थ बोध होऊन आपल्या ज्ञानात भर पडावी.



सर्व प्रथम बुद्धांची ओळख करून दिली आहे. यामध्ये बुद्धांचा जन्म, बुद्धांच्या वडिलांनी केलेली शिक्षणाची व्यवस्था, मनातील प्रश्नांची उत्तरे शोधण्यास घराचा त्याग करून बाहेर पडलेले तथागत बुद्ध, बोधप्राप्ती, लोकांचं दुःख मुक्त करण्यासाठी ४५ वर्ष केलेला प्रवास असे बुद्धांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगून थोडक्यात बुद्धांची ओळख करून दिली आहे.

पुढे 'सात आंधळे आणि हत्ती' या गोष्टी मध्ये नेहमी आपलेच म्हणणे खरे करू नये. इतरांचे न ऐकता मी म्हणेन तेच खरं असा हट्ट न धरता समोरच्याचं म्हणणं ही ऐकून घेऊन त्याच्या मतांचा आदर करावा. कोणत्याही अपुऱ्या माहितीच्या आधारे काहीही निष्कर्ष काढू नये. असा बोध देणारी ही गोष्ट दिली आहे. तसेच 'कष्टाला पर्याय नाही', 'राग हा माणसाचा शत्रू आहे' अशा नावाच्या उत्कृष्ट गोष्टी दिलेल्या आहेत. यात क्रोध हा माणसाचा शत्रू आहे क्रोधामुळे माणूस आपली विवेक बुद्धी हरवून बसतो आणि चिडणं, वाईट बोलणं, इतरांना शत्रू समजायला लागणं यासारख्या गोष्टींच्या आहारी जाऊ लागतो हे पटवून दिले आहे. त्यामुळे कोणत्याही कारणास्तव माणसाने क्रोधित होऊन अपशब्द उदगारून नये. हा बोध देणारी गोष्ट दिली आहे. यानंतर पाचव्या क्रमांकावर 'एकता ही शक्ती आहे', 'अंगुलीमाल कसा बदलला'?, 'मौल्यवान काय?', 'उपाली आणि शाक्य तरुणांची दीक्षा' अशा उत्तमोत्तम बोध देणाऱ्या कथा दिल्या आहेत. पुढे 'निंदा ही सुधारण्याची संधी ' अशी गोष्ट क्रमांक नऊ वर दिलेली आहे. यामध्ये निंदा ही सुधारण्याची एक संधी आहे. निंदे मुळे माणसाने निराश न होता त्याचा खरे खोटेपणा तपासून त्यानुसार स्वतःमध्ये योग्य त्या सुधारणा कराव्यात असा या गोष्टीतून बोध दिला आहे.

पुढे 'मालुंक्यपुत्ताचा प्रश्न', 'ज्ञान ही सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे आणि 'मुलगा मुलगी एक समान' या गोष्टीने शेवट करत मुलगा आणि मुलगी दोघेही समान आहेत. निसर्गाने त्यांच्यात कुठल्याही प्रकारचा भेद केलेला नाही. आपण ही त्यांच्यात भेदभाव करू नये. संधी मिळाली तर मुलांप्रमाणे मुली सुद्धा कर्तृत्व गाजवू शकतात. असा संदेश देणारी गोष्ट दिली आहे.

आजच्या पिढीला बालवयात बुद्ध विचारांची ओळख झाली तर त्यांचे जीवन नक्कीच प्रकाशमान झाल्याशिवाय राहणार नाही असा मला विश्वास वाटतो. कोणत्याही काल्पनिक,जादुई चमत्कारांनी न भरलेल्या गोष्टींचे फक्त ५६ पानी असणारे हे पुस्तक आपण वाचावे आणि आपल्या मुलांना या गोष्टी नक्की समजावून सांगाव्या. या पुस्तकामुळे बुद्धांच्या मार्गदर्शनाच्या दिशेने चालण्यास थोड्याफार प्रमाणात का होईना नक्की मदत होईल यात शंका नाही.मुलांच्या विचारसरणीमध्ये सकारात्मक बदल केल्याशिवाय राहणार नाही असे हे पुस्तक आहे.

या पुस्तकाच्या इंग्रजी आणि हिंदी भाषांतरणाचे मुखपृष्ठ हे दि .२३ मार्च २०२१ रोजी प्रकाशित करण्यात आले असून याचे हिंदीआणिइंग्रजीभ्भाषानुवाद लवकरच वाचकांच्या हाती येतील.

**-रोहित साळुंखे, सातारा**



# अद्वितीय सौंदर्य

पाश्चात्य लोक भारतात राज्य करून गेले.अन् फूल ना फुलाची पाकळी म्हणून कितीतरी संस्कार भारतीयांच्यात सोडून गेले. त्यांची भाषा, रितीरिवाज आपल्या शरीरात भिनले आहेत.... आपण जन्मदिन साजरा करताना केक कापतो.मेणबत्यांवर फुंकर घालून विझवतो. त्यांच्या पांढऱ्या कातडीला आपण गोरे म्हणजे सौंदर्यवान समजू लागलो आहोत.... आपल्या देशातील स्त्री पुरुष परदेशी लोकांइतके गोरे नसतीलही. पण आपल्या काळ्यासावळ्या रंगातच सौंदर्य दडलेले आहे. रेखीव डोळे, तरतरीत नाक आणि लाजेने फुललेले गाल ओठांच्या पाकळ्या भल्याभल्या गोऱ्या सौंदर्यवतींचे सौंदर्य फिके पाडतात. त्यांच्या गोऱ्या कातडीचा फटफटीतपणा आपल्या युवतींच्यात नाही तर हे सावळे सौंदर्य आकर्षित करणारे आहे.....

टप्पोरे डोळे रोखून युवती पाहू लागली तर युवकांची हृदये घायाळ झाल्याशिवाय राहत नाहीत. कोणी चिडवले तर गालावर फुललेले गुलाब अधरांनी टिपण्यास कित्येक पुढे सरसावतील!.... अधरांच्या गुलाबी पाकळ्या उघडून स्मितहास्य करणारी ललना तरुणाईला आकर्षित केल्यावाचून राहणार नाही... हे झाले चेहऱ्याचे सौंदय.... परंतु सौंदर्याच्या अनेक व्याख्या आणि प्रकार आहेत... दिवसभर उन्हांत रानावनात काम करणारी आपली भारतीय स्त्री जेव्हा घरी जाताना आपला दिवसभराचा थकवा दूर करण्यासाठी पाटाच्या खळाळ शुभ्र थंडगार जलाची ओंजळभर पाणी घेऊन स्वतःचे मुखकमल धुते त्यावेळी तिच्या कृतार्थ चेहऱ्यावरील सौंदर्य वाखाणणीय आहे. आपल्या कुटूंबासाठी चुलीसमोर बसून पंचपक्वान्न शिजवणारी गृहिणी जेव्हा गरम पक्वान्न ताटात वाढते अन् घरातल्यांनी ' वाह! काय चवदार जेवण!' असे उद्गार काढतात. तेव्हा स्वस्तुतीने लाजून जेव्हा ती मान वळवते तेव्हा चेहऱ्यावर लाजरे भाव असलेल्या त्या सौंदर्याची अनुभूती लाजवाब!



सौ.भारती सावंत
मो.: ९६५३४५८३५

दिवसभर ऑफिसमध्ये काम करून संध्याकाळी थकून भागून घरी आलेली बाळाची आई जेव्हा बाळाकडे पाहते तेव्हा बाळाला आईला भेटायची लागलेली उत्कंठा पाहून ती हरखते त्या आनंदाला तुलनाच नाही. वर्षभर मेहनत करून आपल्या लेकराला बोर्डाच्या परीक्षेत उत्तम गुण मिळताच कर्तव्यपूर्तीचा आनंद चेहऱ्यावर विलसत असतानाचे सौंदर्य अपूर्व असते. लेकीला शिकून-सवरून मोठी करते आणि तिच्या पाठवणीच्या वेळी एखादी मैत्रीण कौतुकाने जेव्हा पाठ थोपटते तेव्हा हृदय उचंबळून येते आणि त्याचा बहर चेहऱ्यावर विलसत असतो तेव्हा चेहरा लाखात एक सौंदर्यवान भासतो.

शरीराच्या सौंदर्यापेक्षा मनाचे सौंदर्य अपूर्व असते.शांत, नितळ जलासमान मनही स्फटिकमय असेल तर ते जास्त भावते. यामुळे रंग सावळा, काळा की गोरा हे महत्त्वाचे नसून अंतर्मन किती साफ, स्वच्छ,नितळ आहे हे महत्त्वाचे. वरची कातडी पांढरी असेल आणि मनात काळेबेरे विचार असतील तर ते सौंदर्य काय कामाचे! सौंदर्य रंगातून समजत नाही तर वृत्तीतून समजते. आपला स्वभाव आपली नियत कशी त्यावर सौंदर्याच्या पाऊलखुणा उमटतात. कोळशासारखी काळी असणारी व्यक्ती सर्वगुणसंपन्न असेल तर काळा रंग आपोआप नजरेआड होतो. त्या व्यक्तीचे सौंदर्य तलवारीच्या पात्यासम तळपळताना दिसते. ही त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाची निशाणी असते. काळ्या व गोऱ्या वर्णाचे मापदंड आपण आपल्या सोयीने लावले आहेत. ते कोणत्याही फुटपट्टीने मोजता येत नाहीत. आपल्या स्वभावाच्या पैलुंमधून ते आपसूकच निदर्शनास येतात. आणि आपले व्यक्तिमत्व फुलवतात नि बहरतात.

# स्त्रियांमधील मूत्रमार्गातील संक्रमण

मूत्र मार्गातील संसर्ग यालाच ळऊघ असे म्हटले जाते, हा बहुद्धा स्त्रियांमध्ये मुख्यतः दिसून येतो,याचे कारण असे की स्त्रियांची शारीरिक रचना, स्त्रियांमध्ये योनीमार्ग व मूत्रमार्ग हे जवळ जवळ जवळ असल्यामुळे तिथे संक्रमण लवकर होण्याची भीती असते, त्यामुळेच या संदर्भातील लक्षणे असल्यास त्याकडे कानाडोळा न करता योग्य उपचार नाही घेतले तर अत्यंत गंभीर व्याधी होऊ शकतो,तर ही लक्षणे कोणती तसेच त्यावर कसे उपचार करायचे,या विषयी जाणून घेऊ य मूत्रमार्गाचा संसर्ग हा संपूर्ण मूत्रप्रणालीतील कोणत्याही भागास होऊ शकतो. मूत्रप्रणालीमध्ये मूत्रपिंड, मूत्राशय, मूत्रवाहक नलिका आणि मूत्रमार्ग या चार घटकांचा समावेश होतो. मूत्रमार्गातील संसर्गामध्ये यापैकी कोणत्याही भागास संसर्ग होण्याचा संभव असतो. परंतु मूत्रमार्गाचा संसर्ग हा मूत्राशय आणि मूत्रमार्ग या मूत्रप्रणालीतील खालच्या दोन भागांना जास्त होताना दिसतो. या संसर्गाचे प्रमाण पुरुषांपेक्षा महिलांमध्ये सर्वांत जास्त प्रमाणात आढळून येते. संसर्ग मूत्राशयाला झालेला असेल, तर तो अधिकच त्रासदायक होऊन बसतो. पण तो मूत्रपिंडापर्यंत पसरल्यास त्याचा मूत्रप्रणालीवर वाईट परिणाम होतो. बहुतेकदा डॉक्टर्स मूत्रमार्गाचा संसर्ग दूर करण्यासाठी अँटिबायोटिक्सचा वापर करून तो दूर करण्याचा प्रयत्न करतात. परंतु, प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवर काळजी घेतली तर अशा प्रकारचे संसर्ग टाळता येऊ शकतात. मूत्रमार्ग संसर्गाची काही लक्षणे आहेत




ज्यावरून संसर्ग झाल्याचे कळू शकते. मूत्राशय सतत भरल्यासारखे वाटणे,सतत लघवीला येणे,मूत्रोत्सर्जन करताना वेदना होणे, दाह होणे,लघवीचा रंग गडद असणे, लघवीमध्ये रक्ताचे प्रमाण असणे, लघवीचा उग्र वास येणे,महिलांच्या ओटीपोटात दुखणे अशा प्रकारची लक्षणे मूत्रमार्गाचा संसर्गामध्ये दिसून येतात. हे त्रास जाणवू लागल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास निदान होऊन योग्य उपचार घेतल्याने तो कमी होऊ शकतो. परंतु या त्रासांकडे दुर्लक्ष केल्यास संसर्ग वाढत जाऊन त्रासांमध्ये वृद्धीचं होते. मूत्रमार्गाचा संसर्ग विषाणूंनी मूत्रप्रणालीमध्ये शिरकाव केल्याने होतो. विषाणूंनी मूत्रप्रणालीमध्ये प्रवेश केल्यानंतर उपचार घेईपर्यंत ते वाढत राहतात. आणि रुग्णाला सततच्या वेदनांना सामोर जावे लागते. जगभरात वर्षभरात लाखो लोकांना अशा पद्धतीचा संसर्ग होतो, असा संसर्ग होणे हे सामान्य समजले जाते. ज्या पद्धतीने श्वसनमार्गाचा संसर्ग अनेकांना

होत असतो, त्याप्रमाणे मूत्रमार्गाचा संसर्गही अनेकांना होत असतो. म्हणूनच डॉक्टरांच्या मते, मूत्रमार्गाचा संसर्ग एक सर्वसाधारण व्याधी आहे. अनेक महिलांना आपल्या आयुष्यात एकदा तरी अशा तक्रारीवर उपचार करून घ्यावा लागतो. शरीरातील पचनक्रियेनंतर राहिलेले बॅक्टेरिया कोणत्या तरी माध्यमातून मूत्रमार्गावर चिकटून राहतात. अशा जीवाणूंची संख्या वेगाने वाढू लागते. या संसर्गाकडे अनेक दिवस दुर्लक्ष झाले, तर हे जीवाणू मूत्राशय आणि किडनीपर्यंत जाऊन पोहोचतात. यामुळे मूत्राशयाचे आणि किडनीचे नुकसान होते. मूत्रमार्गाला संसर्ग झाल्यानंतर चॉकलेट, दुग्धजन्य पदार्थ आणि मसालेदार पदार्थ आहारातून टाळले पाहिजेत. त्याचबरोबर कॅफिनयुक्त पेये, मद्यपान, शीतपेये यापासूनही दूर राहणे गरजेचे आहे. या पदार्थांमुळे संसर्ग वाढण्याची भीती असते. अशा संसर्गाचे कोणतेही लक्षण आढळून आले, तर शरीरातील द्रव पदार्थांचे प्रमाण तातडीने वाढवावे. दररोज भरपूर पाणी प्यायले पाहिजे. जर तुम्हाला वारंवार मूत्रमार्गाचा संसर्ग होत असेल, तर पाणी पिण्याचे प्रमाण दहा टक्के वाढवावे. सार्वजनिक स्वच्छतागृहात गेल्यावर आधी आणि नंतर फ्लश करावे. त्याचबरोबर कमोडचा वापर करीत असाल तर कमोडची सीट स्वच्छ ठेवली पाहिजे. लघवीला लागल्यास तातडीने जाणे, लघवी थांबवून न ठेवणे अशा पद्धतीने काळजी घ्यावी लागते. अशा प्रकारची दक्षता घेतल्यास संसर्ग टाळता येऊ शकतो...

**–डॉ. राजश्री प्रफुल राऊत**
एम एस (प्रसूती व स्त्री रोग तज्ञ) सहाय्यक प्राध्यापक,
BMAM नागपूर जीवांकुर क्लीनिक, नागपूर